
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 6 | MARCH - 2022

# समकालीन ग्रामीण कथा साहित्य

श्रीमती वंदना उत्तमराव वरकड
सहशिक्षिका, स्वामी विवेकानंद विद्यालय, मंठा, जि.जालना.



समकालीन साहित्य म्हणजे जे साहित्य आपल्या काळाबरोबर आहे. ज्या काळात ते निर्माण होत असते, त्या काळाचे प्रतिबिंब त्यामध्ये असते. त्या काळातील विचार, जाणिवा, मते ज्या साहित्यातून व्यक्त होतात, असे साहित्य म्हणजे समकालीन साहित्य असे म्हणता येईल. हे साहित्य आपल्या काळाची आणि त्या काळातील परिस्थितीशी जवळचे नाते सांगणारे असते. त्या काळात घडलेल्या घटनांचे पडसाद या साहित्यातून उमटतात. या काळातील मानवाच्या इच्छा-आकांक्षा, प्रयत्न, असहाय्यता, पराभव, वेदना, विद्रोह, स्वप्ने आदींचा प्रामाणिक अविष्कार साहित्यातून होतो. त्यामुळे त्याला समकालीन साहित्य असे म्हटले जाते.

मराठीतील १९४५ ते १९६० आणि १९६० ते १९८५ या कालखंडातील साहित्याला समकालीन म्हटले जाते. समकालीन जीवनातील विविध समस्या, प्रश्न, काळविषयक भान, युद्धोत्तर स्थिती याबरोबरच साहित्यविषयक नव्या विचारांचाही प्रभाव भारतीय साहित्यावर पडलेला दिसतो. प्राचीन, अर्वाचीन, समकालीन हे तिन्ही शब्द काळाचा निर्देश करणारे तर आधुनिक हा दृष्टिकोनाचा निर्देश करणारा शब्द आहे. आधुनिक आणि समकालीन यातला मुख्य भेद म्हणजे आधुनिक साहित्य हे समकालीन साहित्य असू शकते. परंतु समकालीन साहित्य हे आधुनिक साहित्य असेलच असे नाही. समकालीनमध्ये त्या विशिष्ट काळातील समस्या-प्रश्न-ताण, अंतर्विरोध यांचा समावेश होतो. म्हणजे समकालीनतेमध्ये तात्कालिकतेचा संदर्भ असतो. मनुष्याला तात्कालिक संदर्भ महत्त्वाचे वाटतात. तसेच, काही तात्कालिकतेच्या सीमेबाहेरचे व्यापक संदर्भही असतात.

मराठी साहित्यात १८८५ पासून १९२० पर्यंतच्या आणि त्यानंतर १९२० पासून १९४५ पर्यंतच्या साहित्याच्या संदर्भात आधुनिक हा शब्द सहजपणे वापरण्यात येत असल्याने १९४५ नंतरच्या साहित्यासाठी समकालीन हा शब्द वापरला जातो.

१९४५ नंतर मराठी साहित्यात नवसाहित्याचा उदय झाला. या नंतरच्या कालखंडामध्ये कविता, कथा, कादंबरी इत्यादी साहित्यांच्या प्रकारांमध्ये प्रयोगशीलता, भाषेचा-प्रतिमांचा सूचक वापर, कथानक-निवेदन-भाषा-घाट-तंत्राच्या ठराविक साच्यातून मुक्त, मानवी मनाच्या गुंतागुंतीचे चित्रण इत्यादी वैशिष्ट्ये विशेष करून दिसून येऊ लागले. हे साहित्य काही प्रमाणात आपल्या समकाळातील वास्तव जीवन मांडणारे साहित्य होते. दुसऱ्या महायुद्धातील भीषण विध्वंस, जीवित हानी, मानवी मूल्यांचा जाणवलेला फोलपणा, ईश्वराच्या अस्तित्वाविषयी शंका इत्यादींचा तत्कालीन प्रतिभावंत व संवेदनशील लेखकांवर जो परिणाम घडून आलेला होता, त्यातून हे साहित्य निर्माण झाले आहे. या साहित्यालाही समकालीन साहित्य म्हटले जाते. समकालीन साहित्याच्या अनुषंगाने वसंत

आबाजी डहाके म्हणतात, "समकालीन साहित्य म्हणजे जे आपल्या काळाबरोबर आहे. ज्या काळात ते निर्माण होत असते. ज्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे. त्या काळातील विचार, जाणिवा, मते या साहित्यातून व्यक्त होतात."[१] १९६० ते १९८५ या कालखंडातील साहित्य हे समकालीन साहित्य ठरते कारण या साहित्यात १९६० नंतरच्या मानवी स्थितीचे पडसाद उमटलेले आहेत. स्वतंत्र भारतातील राजकीय, सामाजिक, आर्थिक पातळीवरील संघर्षमय जीवन आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील मानवी संदर्भातील विविध लढायांशी असलेली बांधिलकी या साहित्यातून आढळते. या लेखनाला तात्कालिक आणि व्यापक असे दोन्ही प्रकारचे संदर्भ आहेत.

समकालीन साहित्याचे नवसाहित्य १९४५ ते १९६० आणि नवसाहित्योत्तर साहित्य १९६० ते १९८५ असे दोन कालखंड करण्यात येतात. कारण, पंचेचाळीसच्या आसपास भारताचे स्वातंत्र्य आणि दुसरे जागतिक युद्ध या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्वाच्या घटना घडल्या. त्याचा मराठी साहित्यावर प्रभाव पडलेला आहे. १९६० च्या आसपास देखील स्वतंत्र महाराष्ट्र राज्य, मराठी भाषेला महत्त्व आणि डॉ. आंबेडकर यांचे धम्मचक्रप्रवर्तन या महत्त्वाच्या घटना घडल्या. तसेच जागतिक स्वरूपाच्या घटनाही याच काळात घडलेल्या आहेत. त्यांचा मराठी साहित्यावर प्रभाव पडलेला आहे.

एखाद्या विशिष्ट कालखंडामध्ये काहीएक प्रमाणात समान जाणिवा-अनुभव, समान प्रेरणास्त्रोत, समान भाषावैशिष्ट्ये, समान मूल्यांचा पुरस्कार करणारे, समान जीवनदृष्टी असलेले साहित्य निर्माण होऊ लागते. अनेक लेखक त्यात संख्यात्मकदृष्ट्या भर घालतात, तेव्हा त्या साहित्याचा प्रवाह निर्माण होतो.

१९६० नंतरचे साहित्य खऱ्या अर्थाने समकालीन साहित्य मानले जाते. साठोत्तरी कालखंडात जे ग्रामीण, दलित, स्त्रीवादी साहित्यप्रवाह निर्माण झाले, ते आपल्या काळाशी आणि त्या काळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीशी जवळचे नाते सांगतात.

ग्रामीण साहित्यप्रवाह अंतर्गत ज्या कथा, कविता, कादंबऱ्या लिहिल्या गेलेल्या आहेत. त्यामध्ये आपल्याला साठोत्तरी कालखंडातील ग्रामीण भागातील शेतकरी, बारा बलुतेदार यांचे दारिद्य, त्यांच्यातील सामाजिक, आर्थिक पातळीवरील परस्परावलंबित्व, कृषिव्यवस्थेत कालानुसार होत गेलेले बदल, राजकारण-सहकार-शिक्षण यामुळे ग्रामीण भागात सामाजिक, राजकीय व आर्थिक पातळीवर झालेली परिवर्तने इत्यादीचे वास्तव चित्रण आलेले आहे.

दलित साहित्य प्रवाहामध्ये आपल्याला त्या कालखंडातील दलितांवर होणारे अन्याय, त्यांना पशुपातळीवरची मिळणारी वागणूक, गावगाड्यात जातिव्यवस्थेमुळे त्यांचे असलेले खालच्या पातळीवरील स्थान, शिक्षणामुळे-बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्य यामुळे त्यांच्यात निर्माण होत गेलेले आत्मभान, विद्रोह यांचे चित्रण आलेले आहे.

तर स्त्रीवादी साहित्यात पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीच्या वाट्याला आलेले दुय्यम स्थान, कौटुंबिक व सामाजिक पातळीवर तिच्यावर होणारे अन्याय, 'चूल व मूल' एवढ्यापुरतेच मर्यादित असलेले त्यांचे विश्व, शिक्षित-उच्चशिक्षित-नोकरी करणाऱ्या स्त्रियांना आलेले त्यांच्या स्वत्वाचे भान, स्त्रियांचे उभ्या राहिलेल्या चळवळी इत्यादीचे चित्रण आपल्याला स्त्रीवादी साहित्यात बघायला मिळते.

तत्कालीन समाजाचे वास्तव चित्रण या साहित्यप्रवाहांमध्ये आलेले असल्यामुळे हे साहित्यप्रवाह समकालीन साहित्यप्रवाह ठरतात. मराठी साहित्याला प्राचीन कालखंडापासून समृद्ध परंपरा लाभलेली आहे. काळाच्या प्रवाहात साहित्याच्या आकारात अनेक बदल झाले. या बदलाच्या प्रवृत्ती-प्रवाहाच्या अनुषंगाने साहित्याचा विचारविमर्श सुरू झाला. अध्यात्म, उद्बोधन आणि मनोरंजन करणाऱ्या साहित्यापेक्षा जीवनाच्या गुंतागुंतीचे शोध घेऊ लागले. समकालीन ही संज्ञा काळाशी निगडित आहे. तशीच ती आधुनिक मुल्येही प्रगट करते.

साहित्याद्वारे सामाजिक वास्तवाचे भान ठेवून लेखक समकालातील वास्तव मांडतो. या संदर्भात "एकाच काळात राहणारे एकाच वेळी अस्तित्वात घडत असलेले किंवा एकाच वेळेत अस्तित्वात जगत असलेले किंवा

एकाच युगातील एकाच काळातील तसेच एकाच काळाशी निगडित किंवा एकाच काळातील व्यक्ती म्हणजे समकालीन होय."[२] म्हणता येइल. त्याबरोबरच आशयाच्या आविष्कारात लेखक वेगवेगळे प्रयोग करत साहित्यप्रकाराच्या रूढ चौकटीला आव्हान देतो. समकालीन साहित्य विविधांगी प्रश्नांच्या तळाशी जाऊन चर्चा करते. रुढ चौकट मोडून साहित्यिक नव्या जाणिवा मांडत असतो. तो भूतकाळाचा भविष्यकाळाशी धागा येथे जोडत असतो. वर्तमानकालीन जीवनानुभवाचा लेखकावर प्रभाव असल्याने तो नावीन्यपूर्ण आशय मांडत असतो. लेखक त्या समूह घटकाचे अनुभवविश्व सामाजिक जाणिवेतून मांडत असतो.

समकालीन साहित्याचा कालखंड प्रचंड उलथा-पालथीचा आहे. मानवी मूल्यांचा ऱ्हास हे मानव जातीला मोठे आव्हान होते. आंतरराष्ट्रीय घटनांचे पडसाद सबंध जगभर पसरले. पारतंत्र्याच्या विरोधात जगभर जनमत तयार होऊ लागले. देशात स्वातंत्र्याच्या मागणीचा जोर वाढत होता.

या आंदोलनाच्या दबावातून इंग्रजांना देश सोडावा लागला. भारत-पाक विभाजनाचे परिणाम देशभर उमटले. पुढे देशाला अनेक नवाबाबरोबर युद्ध करावे लागले. याचे दीर्घकालीन परिणाम देशावर झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशवासीयांच्या अपेक्षा फोल ठरल्या. राजकारण, प्रशासनामध्ये प्रचंड प्रमाणात आर्थिक अपहार होऊ लागला. दारिद्य, बेकारी या समस्या गंभीर बनल्या. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण यामुळे विकसनशील असणाऱ्या भारत देशावर विपरीत परिणाम झाले. पूर्वीच्या समस्या कमी न होता त्या वाढतच राहिल्या. शिक्षण प्रसारामुळे समाजातील सर्वच घटकातून न्याय-हक्काची मागणी होऊ लागली. विज्ञान-तंत्रज्ञानाची प्रगती, औद्योगिकीकरण-यांत्रिकीकरण यामुळे अनेक समस्यांची नव्याने भर पडली. समाजाचा प्रतिध्वनी असणाऱ्या साहित्यातून याचे सूर उमटू लागले. यालाच समकालीन साहित्य म्हटले जाऊ लागले. साहित्याच्या रूढ चौकटीला छेद देत अनेकांनी आपले अनुभव मांडले. साहित्याच्या रूपबंधापेक्षा अनुभव विश्वाला प्राधान्य आले. या अनुषंगाने कित्येकांनी साहित्य लेखन केले. यातून विविध साहित्य प्रवाहांचा उगम झाला. हे प्रवाह पुढे असे आविष्काराने समृद्ध झाले. यापैकी समकालीन मराठी साहित्य हा एक प्रवाह होय.

निशिकांत ठकार समकालीन साहित्याबाबत म्हणतात, "जे साहित्य आजही आपल्या स्पंदनशीलतेचा प्रत्यय देते, जे गतीशील आहे आणि जे कालस्वर ओळखते, त्यास समकालीन साहित्य म्हटले पाहिजे. मग ते परंपरेच्या पडद्यातून आलेले असो किंवा नवतेच्या नांदीतून आलेले साहित्य"[३] प्रारंभीची कथा समाजातील मानवी स्वभाव प्रसंग आणि अनुभवाच्या दृष्टीने साकारल्या होत्या. पुढील काळातील मराठी कथा परंपरेच्या साच्यातून मुक्त झाली. सामाजिक वास्तवाला कथेत प्राधान्य दिले. समकालीन कथासाहित्यात माणूस, त्याचे अनुभवविश्व व जीवनशैली या सर्वांचा समावेश होऊ लागला. सतीश तांबे म्हणतात, "समकालीनामध्ये काही गोष्टी गतकालीन म्हणजे पारंपरिक ती काही काळाच्या पुढच्या तर काही सार्वत्रिक / त्रिकालाबाधित अशा असतात."[४] त्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू माणूस होता. देशातील सामाजिक-राजकीय-आर्थिक परिस्थितीसुद्धा लेखकाला अस्वस्थ करणारी होती. लोकशाही व्यवस्थेत समानता येण्यापेक्षा विविध स्तरावर विषमता वाढत होती. समाजात फक्त जातीय विषमता नव्हती. तर, महागाई-बेकारी-गरिबी, भांडवलशाही व्यवस्था, शहरी-ग्रामीण यांच्यातील विषमतेची दरी वाढत होती, ती आजही वाढतच आहे. खेड्यात आणि महानगरीय समाजात एकाकीपण, असुरक्षितता, उदासीनता, भरकटलेपणा यासारखे नवेच प्रश्न नव्याने निर्माण झाले. याचेच पडसाद कथासाहित्यातून कथेतून उमटू लागले. साहित्य आणि समाज जीवन यांचे परस्पर संबंध दृढ झाले. हा कालखंड साहित्य लेखकांना झपाटून टाकणारा आहे. याच काळात अनेकविध विषयावर लेखन झाले.

चारुता सागर, मधु मंगेश कर्णिक, भाऊ पाध्ये, कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, सरोजनी बाबर, अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, व्यंकटेश माडगूळकर यासारख्या असंख्य कथालेखकांनी मध्यमवर्गीयांच्या विश्वा पलिकडचे विश्व कथेत साकार केले. कथातून वास्तवाची अपरिचित रूपे दाखवली.

समकालीन साहित्याच्या दुसऱ्या टप्प्यात कथा तांत्रिकदृष्ट्या मांडणीच्या दृष्टीने मुक्त झाली. त्यामुळे तिच्यात आशयाच्या व अभिव्यक्तीच्या दृष्टीने विविध बदल झाले. जागतिकीकरण-उदारीकरण-औद्योगिकीकरण यामुळे मानवी जीवनाच्या अस्तित्वाचे प्रश्न निर्माण झाले. जागतिकीकरणामुळे फोफावलेली खाउजा संस्कृती. या संस्कृतीमुळे महानगरात यांत्रिकीकरणाचा प्रभाव व ग्रामीण संस्कृतीवर महानगरीय संस्कृतीची छाप पडलेली दिसते. समाजातही अस्वस्थता वाढत होती. मानवी मनाला एक प्रकारचा बकालपणा आलेला होता. सत्ता संघर्षाची प्रवृत्तीही बळावत गेली. समाज जीवनात निर्माण झालेले प्रश्न, माणसातील मत्सरी वृत्ती, राजकारणातील डावपेच, खुनशी वृत्ती, स्त्रीयांचे प्रश्न, कृषी जीवनातील प्रश्न, आणि गावगाड्यातील पेचप्रसंग अशा वैविध्यपूर्ण घटनांचे वास्तवदर्शी चित्रण कथा साहित्यातून आले.

यांत्रिकीकरणाच्या प्रभावाखाली आलेले मानवी जीवन, यंत्रामुळे वाढत जाणारी बेरोजगारी, हिंसाचाराकडे वळणारे तरुण, भ्रष्टाचाराचे वाढलेले साम्राज्य, स्वार्थाने बरबटलेले राजकारण यासारख्या प्रश्नांचे चित्रण समकालीन कथा साहित्यातून अविष्कृत झाले.

माणसाची तहान पाण्याने भागवून पुण्यकर्म कमावणारी माणसे आज पाणी विकू लागली आहेत. पैसा हे माणसाचे सर्वस्व बनलेला आहे. स्वार्थाने आंधळ्या झालेल्या माणसांना त्याचा विसर पडलेला आहे. समाजाशी माझी बांधिलकी काय आहे ? माझी सामाजिकता काय ? माझी सामाजिक जबाबदारी कोणती ? याचे भान विसरून गेलेला आहे. प्रत्येक जण स्वार्थी बनला, माणसामाणसातील परोपकाराची भावना नष्ट झाली आहे. याविषयीचे विविधांगी कथालेखन भास्कर चंदनशिव, वासुदेव मुलाटे, राजन गवस, आसाराम लोमटे, लक्ष्मीकांत देशमुख, चंद्रकुमार नलगे, नामदेव माळी, सदानंद देशमुख, प्रतिमा इंगोले यांनी केले. दुसऱ्या कालखंडातील समकालीन कथासाहित्य वस्तुनिष्ठ, व्यक्तिकेंद्री बनले. मानवी मनाच्या तळातील भावाविस्काराचे दर्शन त्यातून आले.

समकालीन कथा साहित्य बहुआयामी व बहूप्रवाही बनले. प्रारंभीच्या काळात समकालीन कथा साहित्यात समाजातील विविध प्रश्नांना हात घालता आला नसला तरी पुढील काळात समकालीन कथा साहित्याच्या अनुभव कक्षा रुंदावल्या गेल्या आहेत. हे साहित्य काल्पनिक रंजनपर विश्वात न रमता धगधगते अनुभवविश्व साकारते. काळाबरोबर प्रवाही राहून नवीन समस्यांचा-प्रश्नांचा वेध घेणे हे समकालीन कथा साहित्याचे महत्त्वाचे प्रयोजन होय.

## समकालीन कथा :

मानवी कल्पना विश्वा पलीकडे अपरिचित रूप दाखवणारी मराठी कथा ही संपकाळात अमुलाग्र बदललेली आहे. आज तिला पारंपारिकतेच्या एका ठराविक कथानकाच्या साचेबद्धपणातून मोकळे केले गेले आहे. कथेत मनोविश्लेषणाला आणि सामाजिक वास्तवाला प्राधान्य दिले आहे. कथेत विविध प्रतिमां-प्रतिकांचा वापर होऊ लागला. शब्द निवड, शैली, निसर्गाची प्रतीके या सर्वांच्या वापराने कथेत वेगळेपणा आला. यामुळे समकालीन कथा आशयदृष्ट्या सरस बनली. महानगरीय व पाश्चात्त्य संस्कृतीच्या आगमनाने अस्वस्थता मात्र वाढतच आहे. माणूस, त्याचे परस्पर संबंध यात तफावत निर्माण होऊ लागली. माणसे दुरावली आणि यंत्राशी जोडली गेली. त्यामुळे मानवी अस्तित्वाचे अनेक प्रश्न नव्याने निर्माण झाले.

या कथेच्या स्वरूपाविषयी गंगाधर गाडगीळ यांचे मत महत्वाचे वाटते. ते म्हणतात, "नवकथेच्या लेखकांनी कलेच्या क्षेत्रातील अनेक संकेत झुगारून दिले आहेत. हेच तिचे मोठे वैशिष्ट्ये. त्यांचा पहिला संकेत हा कथेच्या विषयासंबंधी अनेक अनुभव हे कथांचे विषय होऊ लागले व दुसरा संकेत झुगारला तो भावनाविवश जनतेचा प्रत्येक अनुभव अर्थपूर्ण करायचा असेल व कलात्मक पातळीवर न्यायचा असेल तर भावनांच्या आवेगात त्याला बोलून काढलाच पाहिजे असे त्यांना वाटत नाही"[५] गाडगीळांचे हे मत कथा साहित्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.

नवकथाकार यांनी नवकथा लिहिताना अनेक प्रयोग केले. निवेदनाच्या अनेक पद्धती हाताळल्या. तसेच कथा रचना ही कथानकानुरूपच वेगवेगळ्या पद्धतीने केल्या आहेत. भाषाशैलीचा वापर अचूकपणे केला आहे. माणसाचा एकाकीपणा हा बहुतेक कथांचा विषय बनला आहे. माणूस हा त्याच्या मनातील व समाजातील गुढ शक्तीचा तो दास बनला आहे. या सत्याचा अविष्कार या कथेतून घडला आहे.

आनंद यादव, श्याम मनोहर, राजन गवस, सदानंद देशमुख, आसाराम लोमटे, भास्कर चंदनशिव, शशिकांत चौधरी, चंद्रकुमार नलगे, रा.रं.बोराडे, सयाजीराव मोकाशी, चारुता सागर, महादेव मोरे, कृष्णा इंगोले, मोहन पाटील,म.भा. भोसले, किरण गुरव, द. ता. भोसले, ललिता गादगे, मथु सावंत, उमेश मोहिते या नवकथाकारांनी आपल्या कथांमधून उद्ध्वस्त झालेली ग्रामव्यवस्था राजकारणातील स्थित्यंतरे शहराकडे धावणारा खेड्यातील माणूस यामुळे उद्ध्वस्त होत चाललेली कृषिसंस्कृती. बदललेला गावगाडा, यांत्रिकीकरणाचा परिणाम, सुशिक्षितांचे तुटलेपण असे अनेक गंभीर विषय कथाकारांनी कथेत मांडले. ग्रामीण जीवनाचा केंद्रबिंदू असणारी स्त्री आणि तिचे कष्टमय जीवन यांचा वेध कथाकारांनी घेतला आहे. ग्रामीण स्त्री म्हणजे अनेक प्रश्नांनी समस्यांनी गांजलेली. कष्टाळू, संसारासाठी झटणारी अशी आहे. तिच्या वाट्याला येणारे कष्टमय जीवन आणि त्यातही सर्वकाही सोसण्याची तिची झालेली मानसिकता यांचे चित्रण कथांमधून येते.

१९९० नंतरची ग्रामीण कथा अस्मानी आणि मानवी संकटाचे वास्तव मांडते. बेकारी, महागाई, भ्रष्टाचार, स्त्रियांचे लैंगिक शोषण, पर्यावरण प्रदूषण, चंगळवाद अशा अनेक समस्यांनी आजचा समाज ग्रासलेला आहे. याचे चित्रण कथासाहित्यातून कथाकारांनी मांडले आहे. तसेच प्रसारमाध्यमांचा समाज मनावरील वाढत जाणारा पगडा, यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. प्रसारमाध्यमांनी जग जवळ आले. पण, माणसे एकमेकांपासून दूर गेली. शेअर बाजाराचे वाढते प्रमाण, नोकरशाहीला अकारण महत्त्व, शेती करण्याकडे कमी लक्ष. औद्योगिक क्रांतीमुळे पर्यावरणाचे संतुलन ढासळले. ढासळती नीतिमत्ता भोगवादीवृत्ती, स्वयंकेंद्रितता, सामाजिक विकासाची उदासीनता अशी अनेक स्थित्यंतरे घडत गेली, घडत आहेत.

एकविसाव्या शतकाला पहिल्याच दशकात तंत्रज्ञानाचे दशक म्हणून नावलौकिक मिळाला समाजात एक अद्भुत क्रांती झाली. सर्व जगाचा चेहरा बदलून गेला. समकालात स्त्रियांचे जीवन मात्र तसेच आहे. त्यापेक्षाही अधिकच असुरक्षित बनले. त्यांच्या समस्यांना पारावारच उरला नाही. त्यांचे जीवन म्हणजे विश्वा पलीकडील विश्व आहे. काही स्त्री लेखिकांनी परंपरेची चौकट मोडून लेखन केले. त्यात कमल देसाई, मेघना पेठे, गौरी देशपांडे, शांता गोखले, सानिया, प्रिया तेंडुलकर, आशा बगे या लेखिकांनी ही रूढ परंपरा-रीतीरीवाजापासून दूर जाऊन आलेले अनुभव व तिच्या समस्या अगदी प्रखरपणे मांडल्या आहेत.

आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध बंड केले आपल्या वेदना व व्यथा साहित्यातून मांडल्या परखड शब्दातून विद्रोह व्यक्त केला साहित्यिकांनी वैचारिक संघर्ष आपल्या लेखणीतून मांडला. समकालीन कालखंडातील साहित्य सर्वांच्या मनाला भिडणारे आणि अस्तित्वाचे भान आणून देणारे ठरले.

आनंद यादव, वामन चोरघडे, शंकर पाटील, मोहन पाटील, रा.रं. बोराडे यासारख्या कथाकारांनी आपल्या कथांमधून मानवी मनाबरोबरच समाज मनाचेही विविध पैलू मांडले आहेत. शंकरराव खरातांनी मानदेशाच्या दुष्काळाचे चित्रण करताना तेथील समाजव्यवस्थेचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या 'अश्रू' या कथेत दुष्काळात सापडलेल्या कुटुंबाचे चित्रण केले आहे. लोक पोट भरण्यासाठी गाव सोडतात, गावात फक्त लहान मुले व म्हातारी माणसे उरतात. दाराला कडी व रिकाम्या दावनी त्यामुळे तेथील समाजजीवन उध्वस्त कसे होते, याचे चित्रण त्यांनी केले आहे.

ग्रामीण माणसाच्या वाट्याला आलेल्या दारिद्याचे चित्रण व्यंकटेश माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसं' या संग्रहात धर्मा रामोशीची मुलगी बजाला अंगवस्त्र अंगभर वस्त्र मिळत नाहीत. म्हणून ती घराबाहेर पडत नाही.

खायला पोटभर अन्न मिळत नाही. असे दारिद्य्र सोसणारी माणसे. कोणतीही तक्रार न करता जगत आहेत. त्यांचे शोषण जसे माणूस करतो, तसेच निसर्गही करतो. समाजाच्या अनेक पिढ्या या दारिद्य्रातच राहिलेल्या आहेत. त्यांना या विळख्यातून बाहेर पडणे शक्य नसते. कारण, त्यावेळी त्यांचे अज्ञान नडते या अज्ञानाचा फायदा घेऊन संधी साधू लोक आपली झोळी भरतात. याचे विदारक सत्य मांडले आहे.

अनेक कथा लेखकांनी अंधश्रद्धेच्या गर्तेत सापडलेल्या समाजाचे वास्तव कथेतून मांडलेले आहे. रणजित देसाई यांच्या अनेक कथांमधून ग्रामीण जीवनातील रूढी परंपरांचे चित्रण येते. त्यांच्या 'भैरव' या कथेत भवानराव, भैरव नावाचा बैल शर्यतीसाठी खरेदी करतात. तो त्यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न असतो आणि शर्यतीच्या शौक, भावकीच्या ईर्षेतून बैल विकत घेतात. पण, तोच बैल त्यांच्या मृत्यूला कारणीभूत ठरतो. 'धनगराची जात' या कथेत मेंढरावरील प्रेम, खंडोबा-बिरोबा या देवाची यात्रा, भूतबाधा, भविष्य, देवर्षी यांच्यावरील विश्वासाचे चित्रण त्यांच्या कथेतून येते.

म.भा.भोसले यांच्या 'अहेव लेणं' या कथेत सोन्याचं डोरलं बायको मागत असते. पण घरच्या गरीब परिस्थितीमुळे तो तिची इच्छा पूर्ण करू शकत नाही. याची रामजीच्या मनाला खंत वाटते. बायकोने लाचार संसारासाठी किती खस्ता खाल्ल्या. पण, आपण तिची एकही इच्छा पूर्ण करू शकलो नाही म्हणून तो कासावीस होतो. या पध्दतीने ग्रामीण कथेतून  संवेदनशीलतेचे दर्शन घडते.

ग्रामीण जीवनात आधुनिकतेचे वारे वाहू लागले. भौतिक सोयीसुविधांबरोबर सुधारणा आल्या. आनंद यादवांनी बदलत्या गावाचे चित्रण 'खताची गाडी' या कथेत चित्रित केले आहे. मुंबईला नोकरीसाठी गेलेला सदा सुट्टीसाठी गावी येतो. गावाचा कायापालट पाहून अचंबित होतो. तो म्हणतो की, "गावाबाहेर असलेल्या स्टँडमधून बाहेर आलो. स्टँडजवळ को-ऑपरेटिव्ह बँकेची शाखा दिसली. एक मोठं सोडा लेमन, कोकोकोलाचं दुकान दिसलं, एक यशवंत सायकल मार्ट दिसलं, दोन-तीन हॉटेलं दिसलं, गावातली अनोळखी पोरं चिवडा भजी खातेली, रेडिओ ढणाढण वाजत सुटलेला, स्टँडवरविजेचे दिवे, डांबरी एकदोन स्कूटरही गेल्या... हे सगळं नवं होतं, गाव ठळक झालं होतं, अंधारात दिमाखानं चमकत आहे, असं वाटलं. इकडे तिकडे बघत चाललो"[६] या कथेत आनंद यादव यांनी ग्रामीण जीवनाच्या बदलाचे अचूक चित्रण केले आहे. त्याचे अनिष्ट परिणामही समाजावर झाले. गावातील पारंपरिक संस्कृती बदलत गेली. एवढेच नाही तर शेतीपूरक व्यवसायावरही गंडांतर आले. एवढ्यावरच हे थांबले नाही. गावात राजकारण आले. निवडणुका आल्या. त्यानंतर समाजात ताण-तणाव, गट निर्माण झाले. त्याचा परिणाम म्हणून खून-मारामाऱ्या आणि पिढ्यान् पिढ्याचे वैर निर्माण झाले. गावाची शांतता भंग पावली. यात भरडला जाऊ लागला सामान्य माणूस. त्याचे मोठ्या प्रमाणावर शोषण होऊ लागले. शेतकरी कर्जबाजारी झाला. त्याच्यावर आत्महत्या करण्याची वेळ आली. त्याच्या जगण्याचे अनेक प्रश्न निर्माण झाले. याचे प्रतिबिंब ग्रामीण कथेतून उमटू लागले.

## यांत्रिकीकरणाचे पडसाद :

ग्रामीण जीवन यांत्रिकीकरणाच्या प्रभावाखाली आले. याचे पडसाद १९६० नंतरच्या ग्रामीण कथेत पडले. अवघे ग्रामीण जीवन यामुळे ढवळून निघाले. खाऊजा धोरणाचा उदय झाल्याने विज्ञान व तंत्रज्ञानाचा प्रभाव घराघरात दिसू लागला. त्यामुळे ग्रामीण विश्वाचे रूप बदलून गेले. समाजात सुधारणा झाल्या. त्यात इंटरनेटच्या जाळ्यामुळे अवघे जग मुठीत आले. पण, शेजारी बसलेली दोन माणसे आपसातील संवाद हरवून बसले. अशा अनेक गंभीर समस्या नव्याने निर्माण झाल्या. याचे कथा रेखाटन श्रीराम गुंदेकर, मनोहर तल्हार, रामचंद्र पठारे, अप्पासाहेब खोत, मोहन पाटील, कृष्णा इंगोले, प्रतिमा इंगोले, किरण गुरव  या ग्रामीण कथालेखकांनी ग्रामीण कथेला ग्लोबलायझेशनच्या प्रवाहात आणले. जागतिकीकरणाचा स्पष्ट आविष्कार म्हणजेच बाजारपेठ. व्यापार, वस्तू, सेवा व वित्तीय गुंतवणूक आदी क्षेत्रातील आर्थिक प्रक्रियेमध्ये परिणाम दिसतो. जागतिकीकरणाचा पहिला परिणाम म्हणजे भांडवलशाही अर्थव्यवस्था होय. याचा ग्रामीण जीवनावर प्रभाव पडला. याचे प्रतिबिंब साहित्यात उमटणे

स्वाभाविक आहे. यात एका बाजूला ग्रामीण वास्तवाची भीषणता आहे. 'इडा पिडा टळू दे' आसाराम लोमटे, 'गारपिट' विलास सिंदगीकर, 'पानबळी' मथु सावंत, 'डांगोरा', 'गोंदण', 'वेना' मंजुषा सावरकर अशा कथाकारांनी समकालीन ग्रामीण कथेवर जागतिकीकरणाचा होणारा परिणाम चित्रित केला. राजकारण, शिक्षण, स्त्रीजीवन, शोषण अशा अनेक विषयांना स्पर्श केला.

कृष्णा इंगोले यांनी जागतिकीकरणाच्या जोखडाखाली ग्रामीण जीवनाचे झालेले परिवर्तन रेखाटताना ' पोटगी ' या कथेतील बाजार, हॉटेल, पानपट्टी, आर.टी. ओ. ड्रायव्हर अशा नवीन संकल्पना कुतूहलाचा विषय बनल्या होत्या. राजन गवस यांनी 'पाजर' या कथेत बाबा मास्तरांच्या घरी टीव्हीवर संसदेवरील हल्ल्याची बातमी पाहून गावातील तरुणांनी गरीब मुलाण्याच्या पोराला मारहाण केली त्यात त्याचा हकनाक बळी गेला. गावा-गावात पूर्वी सर्व जाती-धर्माचे लोक एकत्रित राहत असत. पण, आधुनिकीकरणाच्या विळख्यातून खेडीही सुटली नाहीत हे समाज वास्तव समकालीन कथालेखकांनी मांडले आहे.

## संदर्भ टिपा

१. डहाके वसंत अबाजी, नवसाहित्य व नवसाहित्योत्तर, य.च.मु.वि., नाशिक, प्रथमावृत्ती २००१, पृ. क्र. ०२.
२. आपटे वा.गो., मराठी शब्दरत्नाकर, आनंद कार्यालय प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९२२, पृ. क्र. ५८९.
३. ठकार निशिकांत, साहित्याचे परिघ, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००१ पृ. क्र.१०.
४. तांबे सतीश, समकालीन एक मुलाखत : ऐसी अक्षरे, दिवाळी अंक, प्रहार वृत्तपत्र १० नोव्हेंबर २०१५, पृ. क्र.०५.
५. कुलकर्णी गो.म., मराठी वाङ्मयाचा इतिहास, य.च.म.मु.वि.नाशिक, प्रथमावृत्ती २००१, पृ. क्र.७२.
६. यादव आनंद, डवरणी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, चौथी आवृत्ती, पृ. क्र.१२३.